स्मार्ट ग्राम योजनेस “आर. आर. ( आबा)
पाटील सुंदर गांव पुरस्कार  योजना” असे
नाव देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

## शासन निर्णय क्रमांकः स्माग्रायो-२०२०/प्र.क्र.३९/ योजना-११

बांधकाम भवन, २५ मर्झबान  रोड
फोर्ट, मुंबई-४०० ००१
दिनांक : २० मार्च, २०२०.

**वाचा :**

१) **शासन निर्णय क्रमांकः स्माग्रायो-२०१५/प्र.क्र.१५१-अ/योजना-११, दि.२१.११.२०१६**
२) **शासन निर्णय क्रमांकः स्माग्रायो-२०१५/प्र.क्र.१५१-अ/योजना-११,दि.१६.४.२०१८**
३) **शासन निर्णय क्रमांकः स्माग्रायो-२०१८/प्र.क्र.१४१/योजना-११, दि. २४.७.२०१८**

**प्रस्तावना :**

राज्यातील ग्रामपंचायतींना त्यांच्या क्षमतेनुसार, शासनाच्या विविध योजनेच्या अंमलबजावणी करुन स्वच्छता, व्यवस्थापन, दायित्व, अपारंपारिक ऊर्जा आणि पर्यावरण व पारदर्शकता व तंत्रज्ञानाचा वापर अशा बाबीवर गुणांकन देऊन स्मार्ट ग्रामपंचातीची निवड करुन जिल्हास्तर व तालुकास्तर असे पुरस्कार देण्याबाबत शासनाने दि. २१.११.२०१६च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.

माजी उपमुख्यमंत्री आर. आर. ( आबा) पाटील यांनी ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासात बहुमुल्य योगदान दिलेले आहे. ग्रामीण विकासातील त्यांचे योगदान विचारात घेऊन राज्यात राबविण्यात येत असलेल्या स्मार्ट ग्राम योजनेस "आर. आर (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजना " असे नाव देण्यास दि. २७ फेब्रुवारी,२०२० रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली असून दिनांक ५ मार्च, २०२० रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत त्याबाबतच्या इतिवृत्तास मंजूरी दिली आहे. त्याअनुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

## शासन निर्णय:

स्मार्ट ग्राम योजनेस "आर. आर (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजना" असे नाव देण्यात येत आहे.

२. स्मार्ट ग्राम योजनेच्या अंमलबजावणीसाठी व सनियंत्रणासाठी मा.मंत्री (ग्राम विकास) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य स्तरीय सनियंत्रण समितीची स्थापना संदर्भ क्रमांक-१ मधील शासन निर्णयान्वये

करण्यात आली आहे. त्यानुसार सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी व सनियंत्रणासाठी मा.मंत्री (ग्राम विकास) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य स्तरीय सनियंत्रण समितीची दिनांक १२.२.२०२० रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सदर योजनेची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

(१) आर. आर (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजनेतर्गत पुरस्कार वितरण त्यांच्या पुण्यतिथी दिनी दि. १६ फेब्रुवारी या दिवशी जिल्हास्तरावरुन त्या त्या पालकमंत्री महोदयांच्या हस्ते किंवा त्या त्या जिल्हयातील मंत्री महोदयांच्या हस्ते किंवा त्या त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या हस्ते देण्यात यावा. त्याअनुषंगाने सदर योजनेंतर्गत सुंदर गाव निवडीचे निकष शासन निर्णय दि. २१.११.२०१६ सोबतच्या परिशिष्ट”अ” मध्ये नमूद केले त्याप्रमाणेच राहतील. परंतु, परिशिष्ट”ब” मध्ये सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी नेमून दिलेल्या कालावधीत बदल करण्यात येत असून या शासन निर्णयाच्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट”ब” मधील कालावधीनुसार कार्यवाही करावी.

(२) आर. आर (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजनेतर्गत तालुका सुंदर गाव व जिल्हा सुंदर गाव पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतींना पारितोषिक प्राप्त रकमेतून खालील नाविन्यपूर्ण कामे करण्याबाबत परवानगी देण्यात येत आहे.

(१) अपारंपारिक उर्जा संबंधित अभिनव प्रकल्प
(२) स्वच्छतेबाबत अभिनव प्रकल्प,
(३) महिला सक्षमीकरण आणि मुलांना अनुकुल प्रकल्प,
(४) स्वच्छ पाणी वितरण प्रकल्प,
(५) भौगोलिक माहिती प्रणाली बसविणे(GIS),
(६) आंतरराष्ट्रीय मानदंड, मार्गदर्शक तत्वे, संकलन आणि तपासणीसूची तयार करुन दर्जा वाढविण्यासाठी प्रकल्प राबविणे,
(७) ग्रामपंचायतीच्या हद्दीत सौर पथदिवे बसविणे,
(८)ग्राम पंचायतीच्या हद्दीतील सार्वजनिक जमीनीवरील अतिक्रमण रोखण्यासाठी कुंपन घालणे,
(९) स्मार्ट ग्राम योजनेतर्गत/आर.आर.(आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजना योजनांतर्गत निवड झालेल्या ग्रामपंचायतीने नागरीकांच्या सोईसाठी इंटरनेट वाय-फाय सिस्टीम बसविणे.

(३) सदर योजनेअंतर्गत उपरोक्त नाविन्यपूर्ण कामाव्यतिरिक्त अन्य कामे घ्यावयाच्या प्रस्तावास मा. अ.मु.स./प्र.स./सचिव, ग्राम विकास यांच्या स्तरावरुन निकाली काढण्याबाबत परवानगी देण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००३२०१७४६०९०८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

subhash Uttam Rathod

Digitally signed by subhash Uttam Rathod
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4900ceadef378ce6953fc366d818c664ad0c54be36d6234bdc213e86d85816c2, cn=subhash Uttam Rathod
Date: 2020.05.11 13:04:43 +05'30'

**सुभाष राठोड**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सर्व मा.मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. विरोधी पक्ष नेता( विधान सभा) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
५. मा. विरोधी पक्ष नेता( विधान परिषद) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
६. सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
७. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
९. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
११. अतिरिक्त मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग(सर्व)
१२. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद( सर्व )
१३. सर्व विभागीय आयुक्त
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१६. जिल्हा कोषगार अधिकारी (सर्व)
१७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परिषद (सर्व )
१८. सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पंचायत)
१९. अवर सचिव, वित्त विभाग ( व्यय-१५), मंत्रालय,मुंबई
२०. कक्ष अधिकारी ( वित्त-१) ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
२१. निवड नस्ती ( योजना-११)]

**शासन निर्णय क्रमांक: स्माग्रायो -२०२०/प्र.क्र.३९/योजना-११, दि. २० मार्च, २०२०**

**च्या सोबतचे परिशिष्ट"ब"**

| अ.क्र. | आर.आर.(आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजनेच्या अंमलबजावणीसाठी हाती घ्यावयाचा कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | आर. आर (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजनेसंदर्भात जिल्हास्तरावर व्यापक प्रसिध्दी देणे. | १-१० जून |
| २ | तालुका स्तरावर आर. आर. (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजनेत सहभाग घेऊ इच्छिणा-या ग्रामपंचायतींना परिशिष्ट-अ येथील निकषानुसार स्वंमुल्यांकन करुन ठरावाद्वारे संबंधित तालुक्यातील गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे प्रस्ताव सादर करणे. | ११-२० जून |
| ३ | गट विकास अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या स्वंमुल्यांकन केलेल्या प्रस्तांवाची यादी. तसेच, सदर यादीपैकी सर्वाधिक गुण प्राप्त २५% ग्रामपंचायतींची यादी तपासणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संबंधित तालुक्यासाठी नेमून दिलेल्या तालुका तपासणी समितीकडे देणे. | २१-३० जून |
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी आर. आर (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजनेकरिता तालुका तपासणी समिती व जिल्हा तपासणी समितीचे गठन करणे तसेच गठीत करण्यात आलेल्या तालुका समित्यांना , स्व कार्यक्षेत्र) वगळून इतर तालुक्यांचे वाटप करणे. | १-१५ जुलै |
| ५ | तालुका तपासणी समितीने त्यांना वाटप करण्यात आलेल्या तालुक्यातील स्व मुल्यांकनानुसार सर्वाधिक गुण प्राप्त २५% ग्रामपंचायतींची यादी संबंधित तालुक्यातील गट विकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेणे. | १६-३१ जुलै |
| ६ | तालुका तपासणी समिती संबंधित तालुक्यांच्या गट विकास अधिकारी, पंचायत समितीयांच्याकडून प्राप्त यादीनुसार तालुक्यातील ग्रामपंचायतींची तपासणी करुन गुणांकन देतील. | |
| ७ | तालुका तपासणी समिती संबंधित तालुक्यांच्या तपासण्यात आलेल्या ग्रामपंचायतींची निकषनिहाय गुणांकन यादी पंचायत समिती कार्यालयात प्रसिध्द करतील व तसेच संबंधित ग्रामपंचायतींना कळविणे | १-१५ ऑगस्ट |
| ८ | सदर यादी प्रसिध्द झाल्यानंतर आर. आर. (आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजनेत सहभागी झालेल्या ग्रामपंचायतींना प्रसिध्द | १६-३१ ऑगस्ट |

| अ.क्र. | आर.आर.(आबा) पाटील सुंदर गांव पुरस्कार योजनेच्या अंमलबजावणीसाठी हाती घ्याववयाचा कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| | करण्यात आलेल्या यादीतील गुणांकनाबाबत हरकती घ्यावयाच्या असल्यास सदर ग्रामपंचायती ठराव घेऊन जिल्हा तपासणी समितीकडे विहित मुदतीत अपील दाखल करतील. | |
| ९ | जिल्हा तपासणी समिती प्राप्त हरकतींबाबत आवश्यक वाटल्यास स्थळ पाहणी करुन अंतिम निर्णय देतील व तालुकास्तरावरील सर्वाधिक गुण प्राप्त ग्रामपंचायतीस तालुका स्मार्ट ग्राम म्हणून निवड करतील. | १-१० सप्टेंबर |
| १० | जिल्हा तपासणी समिती संबंधित जिल्हयातील निवड करण्यात आलेल्या सर्व तालुका स्मार्ट ग्राम यांचे परिशिष्ट-अ मधील निकषांनुसार पुनर्मुल्यांकन करतील. सदर पुनर्मुल्यांकन संबंधित ग्रामपंचायतीने तीन महिन्याच्या कालावधीत परिशिष्ट-अ मधील निकषांमध्ये यापूर्वी तालुका तपासणी समितीने केलेल्या तपासणीच्या अनुषंगाने प्रगती केली असेल तर त्यास त्याप्रमाणात गुण देतील. | १-२० ऑक्टोंबर |
| ११ | जिल्हा तपासणी समिती सदर पुनर्मुल्यांकनामधून सर्वाधिक गुण मिळालेल्या ग्रामपंचायतीस जिल्हा स्मार्ट ग्राम म्हणून घोषित करतील | १६-३१ डिसेंबर |
| १२ | मा. कै. आर. आर. ( आबा ) पाटील यांच्या पुण्यतिथी दिनी दिनांक १६ फेब्रुवारी रोजी तालुका व जिल्हा स्मार्ट ग्राम ग्राम पंचायतींना पारितोषिक वितरण करण्यात येईल. | दि. १६ फेब्रुवारी |